# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३६४/२०२१

**अपिलार्थी, श्री. ब्रम्हानंद राजाराम तेरेखोलकर**

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग,
दालन क्र.१२९, आस्थापना शाखा,पहिला मजला, ,
सिंधुदुर्गनगरी, ओरोस,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ४१६ ८१२

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (ग्रांप. विभाग),**
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, दालन क्र.१३७,
आस्थापना शाखा,पहिला मजला, , सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ,
जि.सिंधुदुर्ग ४१६ ८१२

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, ओरोस,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ४१६ ८१२

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१.२०२० | १६.३.२०२० | २४.२.२०२० | २०.१०.२०२० |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी आणि तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक २०.१.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*दि.२०.१२.२०१७ रोजी नेमलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांची व त्यांच्या पधावधीची माहिती याचे नियमानुसार व्यक्तीश नमूद कसुरीचा कारभाराचा ताबा घेऊन खंडीत करून सुरळीत केलेल्या कारभाराची माहितीबाबत.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ व २ ची माहिती ही जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुर्ग यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने दि.१६.३.२०२० रोजी सदरचा माहिती अर्ज, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ६ (३) अन्वये संबंधित कार्यालयास हस्तांतर केला असून मुद्दा क्र. ३ ची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनीही दि.१८.४.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ व २ ची उपलब्ध माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलियं प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं), जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनीही प्रथम अपिल आदेशानंतर दि.९.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.१०.२०२० रोजी सुनावणी घेऊन, "अपिलार्थी श्री. ब्रम्हानंद रा. तेरेखोलकर, मु. पो. परबवाडा यांना या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती प्रथम अपिल सुनावणी झाल्यानंतर अंशत: कागदपत्रं या कार्यासनाकडे उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी उपलब्ध असलेल्या नस्तीची पाहणी करून आवश्यक असणारे कागदपत्र चिन्हांकित करून दयावेत." असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदर्ग यांनी दि.१८.४.२०२० रोजी व प्रथम अपिलिय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनीही प्रथम अपिलाच्या आदेशानंतर दि.९.१२.२०२० रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. परंतु सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले नसल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी आता अपिलार्थीस सदर संचिकेचे निरिक्षण देऊन उपलब्ध माहिती पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत पोच देय डाकेने पत्र पाठवून प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित माहिती अर्जासंदर्भात कार्यालयात उपलब्ध संचिकेच्या अवलोकनासाठी दिनांक व वेळ कळवावी. अपिलार्थी यांनी अवलोकन केल्यानंतर त्यांनी चिन्हांकित करुन दिलेल्या २५ पानांपर्यंतच्या कागदपत्रांच्या प्रती समक्ष नि:शुल्क पुरवाव्यात. उर्वरित कागदपत्रांच्या पानांकरीता विहित शुल्क आकारावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**